क्र.१३० पहिले वर्ष

२२ फेब्रुवारी २०२३

# रविवारची  उपासना

## राखेचा बुधवार

### प्रस्तावना

आजपासून उपवासकाळाला सुरुवात होत आहे. उपवास काळ हा परिवर्तनाचा काळ, पश्चात्ताप करण्याचा काळ आहे. आपला पापी मार्ग सोडून परमेश्वराकडे वळण्याचा काळ आहे. ह्या काळात आपण पापात न पडण्याचा निश्चय करू या. आपण दुर्बल असल्यामुळे हे निश्चय तंतोतंत पाळणे अवघड जाते आणि म्हणून त्यासाठी काही त्याग करू शकत नसलो तरी लहान लहान गोष्टींमध्ये त्याग करून देवाकडे वळण्याचा प्रयत्न करू या. मी मोठ्या भक्तीभावाने, क्रूसाच्या वाटेच्या भक्तिमध्ये सहभागी होईन, प्रामाणिकपणे अभ्यास करीन अशा प्रकारचा निश्चय करू या आणि उपवास काळात प्रभू येशूच्या कृपेची याचना करू या.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करू या.**

हे प्रभो, अनिष्टाविरूध्द चाललेल्या आमच्या या युध्दात आमचे संरक्षण कर. प्रायश्चित्तकाळात आम्ही आज प्रवेश करीत आहोत. स्वार्थत्यागी जीवन जगण्यास आम्हांला साहाय्य कर व हा प्रायश्चित्तकाळ पवित्र कर. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

### पहिले वाचन

**सिंदेष्टा योएलच्या पुस्तकातून घेतलेले वाचन २:१२–१८**

**''आपली वस्त्रे नव्हे तर आपले हृदय फाडा.''**

आता तरी परमेश्वराचे वचन ऐका; मन:पूर्वक मजकडे वळा; उपोषण, आक्रंदन व शोक करून वळा. आपली वस्त्रे नव्हे तर आपले हृदय फाडा आणि परमेश्वर तुमचा देव याजकडे वळा, कारण तो कृपाळू, कनवाळू, मंदक्रोध, दयासागर आहे; अरिष्ट आणिल्याबद्दल त्याला वाटण्यासारखे आहे. परमेश्वर तुमचा देव याला कळवळा येऊन तो मागे वळेल व आपल्यामागे आशीर्वाद ठेवून जाईल की नाही कोण जाणे; असे की जेणेकरून तुम्हांस त्याला अन्नार्पण व पेयार्पण करिता येईल.

सियोनांत कर्णा वाजवा; उपासाचा एक पवित्र दिवस नेमा, पवित्र मेळा भरवा. लोकांस जमवा, मंडळी शुध्द करा, वडिलांस जमवा, मुले व स्तनपान करणारी अर्भके यांसही एकत्र करा; वर आपल्या खोलीतून व वधू आपल्या मंडपांतून बाहेर येवोत; देवडी व वेदी यांच्यामध्ये याजक, परमेश्वराचे सेवक, रुदन करीत म्हणोत, हे परमेश्वरा, आपल्या लोकांवर करुणा कर; आल्या वतनाची अप्रतिष्ठा होऊ देऊ नको; होऊ देशील तर राष्ट्रे त्याची निर्भत्सना करतील; त्यांचा देव आता कोठे गेला असे राष्ट्रांनी का म्हणावे? तेव्हा परमेश्वराने आपल्या देशाविषयी ईर्ष्या धरिली,
तो आपल्या लोकांविषयी कळवळला.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### प्रतिसाद स्तोत्र

५०: ३–१७

प्रतिसाद : **हे प्रभो, आम्हावर दया कर, कारण आम्ही पाप केले आहे**

१. हे देवा, तू आपल्या वात्सल्यास अनुसरून माझ्यावर कृपा कर. तू आपल्या विपुल करुणेस अनुसरून माझे अपराध पुसून टाक. मला धुऊन माझा दोष अगदी काढून टाक, माझे पाप दूर करून मला स्वच्छ कर.(प्र)

२. मी आपले अपराध जाणून आहे. माझे पाप माझ्यापुढे नित्य आहे. तुझ्याविरुध्दच मी पाप केले आहे. तुझ्या दृष्टीने जे वाईट ते मी केले आहे. (प्र)

३. हे देवा, माझ्या ठायी शुध्द हृदय उत्पन्न कर. माझ्या ठायी स्थिर असा आत्मा पुन्हा घाल. तू मला आपणापुढून घालवून देऊ नकोस आणि आपला पवित्र आत्मा माझ्यामधून काढून घेऊ नकोस.(प्र)

४. तू केलेल्या उध्दाराचा आनंद मला पुन्हा दे आणि उत्सुकतेच्या आत्म्याने मला सावरून धर. हे प्रभो, माझे ओठ उघड, म्हणजे मी तुझी कीर्ती गाईन. (प्र))

### दुसरे वाचन

**संत पौलाचे करिंथकरांस पाठवलेल्या दुसऱ्या पत्रातून घेतलेले वाचन ५:२०–६:२**

**''देवाबरोबर समेट करा... पाहा, आताच समय अनुकूल आहे.''**

म्हणून देव आम्हांकडून विनवित असल्यासारखे आम्ही ख्रिस्ताच्या वतीने वकिली करितो; देवाबरोबर समेट केलेले असे तुम्ही व्हा, अशी आम्ही ख्रिस्ताच्यावतीने विनंती करितो. ज्याला पाप ठाऊक नव्हते त्याला त्याने तुमच्या आमच्याकरिता पाप असे केले ह्यासाठी की, आपण त्याच्याठायी देवाचे नीतिमत्व असे व्हावे. आम्ही त्याच्यासह कार्य करिता करिता विनंती करितो की, तुम्ही देवाच्या कृपेचा स्वीकार व्यर्थ होऊ देऊ नये; कारण तो म्हणतो अनुकूलसमयी मी तुला साहाय्य केले; पाहा आताच समय अनुकूल आहे; पाहा आताच तारणाचा दिवस आहे.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### जयघोजयघोष

**स्तोत्र.५०:१२,१४**

**आलेलुया, आलेलुया**

हे देवा, माझ्या ठायी शुध्द हृदय उत्पन्न कर आणि तुझ्या उद्धाराचा आनंद मला दे.

**आलेलुया**

### शुभवर्तमान

**संत मत्तयच्या शुभवर्तमानातून घेतलेले वाचन**

**६:१–६,१६–१८**

**''गुप्त गोष्टी जाणणारा तुझा पिता तुला फळ देईल.''**

येशू आपल्या शिष्यांना म्हणाला,

माणसांनी पाहावे या हेतूने तुम्ही आपले धर्माचरण त्यांच्यासमोर न करण्याविषयी जपा; केले तर तुमच्या स्वर्गातील पित्याजवळ तुम्हांस प्रतिफळ नाही. यास्तव जेव्हा जेव्हा तू दानधर्म करतोस, तेव्हा तेव्हा लोकांनी आपला गौरव करावा म्हणून, ढोंगी जसे सभास्थानात व रस्त्यात आपणांपुढे शिंग वाजवितात तसे करू नकोस. मी तुम्हास खचित सांगतो की, त्यांना त्यांचे प्रतिफळ मिळाले आहे. तर तू दानधर्म करतोस तेव्हा तुझा उजवा हात काय करतो हे तुझ्या डाव्या हाताला कळू नये; अशा हेतूने की तुझा दानधर्म गुप्तपणे व्हावा म्हणजे तुझा गुप्तदर्शी पिता तुला तुझे फळ देईल. तसेच जेव्हा जेव्हा तुम्ही प्रार्थना करिता तेव्हा तेव्हा ढोंग्यांसारखे असू नका कारण लोकांनी आपणांस पाहावे म्हणून सभास्थानांत व चव्हाट्यावर उभे राहून प्रार्थना करणे त्यांना आवडते. मी तुम्हास खचित सांगतो की, त्यांना त्यांचे प्रतिफळ मिळाले आहेत. तू तर जेव्हा जेव्हा प्रार्थना करतोस तेव्हा तेव्हा आपल्या खोलीत जा व दार लावून घेऊन आपल्या गुप्तवासी पित्याची प्रार्थना कर म्हणजे तुझा गुप्तदर्शी पिता तुला तिचे फळ देईल. तुम्ही जेव्हा उपवास करितां तेंव्हा ढोंग्यासारिखे म्लानमुख होऊ नका, कारण आपण उपवास करीत आहो असे लोकांना दिसावे म्हणून ते आपले तोंड विरूप करितात. मी तुम्हांला खचित सांगतो की, त्यांना त्यांचे प्रतिफळ मिळाले आहेत. तू तर उपवास करतोस तेव्हा आपल्या डोक्याला तेल लाव व आपले तोंड धू अशा हेतूने की, तू उपवास करीत आहेस हे लोकांना नव्हे तर तुझ्या गुप्तवासी पित्याला दिसावे म्हणजे तुझा गुप्तदर्शी पिता तुला फळ देईल.

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## राखेला आशीर्वाद

(प्रवचनानंतर राखेला आशीर्वाद)

धर्मगुरू :

प्रिय ख्रिस्ती मित्रांनो, आपला पश्चात्ताप दर्शविण्यासाठी आपण ह्या राखेचा उपयोग करणार आहोत. आपला पिता परमेश्वर ह्यास ही राख आशीर्वादित करण्याची आपण विनंती करू या.

मूक प्रार्थनेसाठी विराम

हे प्रभो, क्षमेची याचना करणाऱ्या पाप्यांना आणि ह्या राखेचा स्वीकार करणाऱ्या सर्वांना + आशीर्वादित कर, पुनरुत्थानदिनाच्या पूर्वतयारीच्या ह्या प्रायश्चित्तकाळात सर्वांची अंत:करणे पवित्र होऊ देत. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो.

धर्मगुरू खालील शब्द म्हणत लोकांच्या कपाळावर राख लावतात.

पापापासून दूर राहा. पश्चात्ताप कर व सुवार्तेवर विश्वास ठेव किंवा

हे मनुष्या, तू माती आहेस आणि मातीला पुन्हा मिळणार आहेस, याचे स्मरण ठेव.

## अर्पणावरील प्रार्थना

हे प्रभो, या प्रायश्चित्तकाळात प्रायश्चित्त व दयाकृत्ये करण्यास आम्हांला साहाय्य कर. मोहापासून आम्हाला दूर ठेव. आमच्या स्वार्थत्यागी कृत्याने आमचा मेंढपाळ प्रभू ख्रिस्त याचे मरण व पुनरुत्थान याच्या सोहळ्यात सहभागी होण्यास आम्हांला पात्र कर. पापांपासून आमची मुक्तता कर व आम्हांला नवजीवन दे. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे प्रभो, ख्रिस्तप्रसाद सेवनाने व प्रायश्चित्तकाळातील आमच्या प्रायश्चित्तामुळे तुझे नाव गौरविले जावो आणि आम्हांला तुझे संरक्षण मिळो. ही प्रार्थना आम्ही प्रभू येशूच्या नावाने करतो.

## चिंतन

ख्रिस्ती उपासना वर्षातील ५२ पैकी तब्बल १३ आठवडे ख्रिस्तसभा प्रभू येशू ख्रिस्ताच्या दु:खसहन, मरण व पुनरुत्थानावर चिंतन करण्यात घालवीत असते. प्रायश्चित्त काळातील सहा आठवडे हे आपल्या पृथ्वीतलावरील जीवनाचे तर पुनरुत्थानकाळातील सात आठवडे हे स्वर्गीय जीवनाचे प्रतिक होत. पृथ्वीवरील जीवन हे नश्वर असून माणूस आपल्या दुर्बळतेपायी सतत पापात पडतो व गुलामगिरीचे जीवन जगतो. ह्या संघर्षाच्या काळात त्याने मनापासून पश्चात्ताप करून जर आपले मार्ग बदलले तर त्याला स्वर्गीय सुखाचा अनुभव या पृथ्वीवरच येऊ शकतो.

**१) मानवी जीवनाची क्षणभंगुरता :** थंडगार पाण्यासाठी उन्हाळ्यात माठासमोर लोकांनी भली मोठी रांग लावलेली होती म्हणून कोणीतरी त्या माठाला विचारले, ''तुला थोडाफार गर्व वाटत नाही का?'' त्या माठाने किती सुंदर उत्तर दिले, ''ज्याचा भूतकाळ मातीचा आहे, ज्याचा वर्तमानकाळ मातीचा आहे आणि ज्याचा भविष्यकाळदेखील मातीचा आहे त्याला गर्व कशाला?'' माणसाचे जीवनही तसेच आहे ह्याची जाणीव करून देण्यासाठी ख्रिस्तसभा आज भाविकांच्या कपाळाला राख लावीत म्हणते, ''मानवा, तू माती आहेस आणि मातीला मिळशील.''

**२) मातीच्या मडक्यात स्वर्गीय संपत्ती :** आपले शरीर हे जरी मातीचे मडके असले तरी त्यात परमेश्वराचा श्वास असलेला पवित्र आत्मा ही स्वर्गीय संपत्ती साठविण्यात आलेली आहे. 'पात्र असो मातीचे वा लाकडाचे, वेड मजला आतल्या अमृताचे' ह्या उक्तीनुसार आपल्या नश्वरतेबरोबरच आपल्यामध्ये असलेल्या ईश्वरी अंशाची जाणीव ह्या प्रायश्चित्तकाळात आपल्याला करून दिली जाते.

**३) आंतरिक संघर्ष :** एकीकडे ईश्वराविषयीची ओढ व उत्कंठा तर दुसरीकडे मानवी दुर्बळतेमुळे जागतिक गोष्टींविषयी वाटणारे आकर्षण असा आंतरिक संघर्ष माणसाच्या जीवनात सुरू असतो. त्याची पुरेशी जाणीव नसली तर शीड फाटलेल्या जहाजासारखी व दोरी तुटलेल्या पतंगासारखी माणसाची गत होऊ शकते. केवळ जाणीवदेखील पुरेशी नसते. त्यासाठी एक आध्यात्मिक साधना हाती घ्यावी लागते.

४) आध्यात्मिक साधना : कपाळाला राख लावीत धर्मगुरू म्हणतात, ''पश्चात्ताप करा आणि सुवार्तेवर विश्वास ठेवा.'' पश्चात्ताप करायचा म्हणजे पापी जीवनशैलीपासून माघारी वळायचे. सुवार्तेवर विश्वास ठेवायचा म्हणजे ह्या पापी जीवनातून आपण मुक्त होऊन नवीन जीवन सुरू करू शकतो. एक वेगळे विश्व. शक्य आहे यावर भरवसा ठेवायचा. त्यासाठी प्रार्थना, उपवास आणि दानधर्म ही त्रिसूत्री आध्यात्मिक साधना म्हणून आपल्याला सुचविण्यात आलेली आहे.

**आत्मपरीक्षण :** ह्या प्रायश्चित्तकाळात मी कोणती आध्यात्मिक साधना हाती घेणार आहे? त्याद्वारे मला माझ्या जीवनात कोणकोणत्या प्रकारचा बदल करायचा आहे?

●●●